ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १७ ऑगस्ट, १९५५ | अंक ३३

## विविध माहिती

**पाकिस्तानी रुपयांची किंमत**—पाकिस्तान सरकारने आपल्या रुपयाची किंमत कमी केल्यामुळें ब्रह्मदेशाच्या सरकारनें देशांतुन पाकिस्तानला पाठविण्यांत येणाऱ्या मनीऑर्डरींना तात्पुरती बंदी केली आहे. पाकिस्तानच्या पोस्ट-खात्याशीं ह्या बाबतच्या नव्या व्यवस्थेसंबंधीं निर्णायक बोलणी होईपर्यंत बंदी चालू राहील असें समजतें.

**ऑल इंडिआ लायब्ररी सर्व्हिस**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ऑल इंडिआ लायब्ररी सर्व्हिसची स्थापना करण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे. दुसऱ्या कार्यक्रमांत देशांतील वाचनालयें वाढविण्याचा सरकाचा बेत असल्यानें अशा प्रकारच्या सर्व्हिसची आवश्यकता भासत आहे. पश्चिम भारतासाठीं एक व दक्षिण भारतासाठी एक, अशीं दोन नवीं राष्ट्रीय वाचनालयेंहि स्थापन करण्यांत येणार आहेत.

**जगाच्या प्रलयाचा सोपा मार्ग**—न्यू यॉर्क ॲकेडेमी ऑफ सायन्सचे एक सभासद डॉ. लेव्हिन ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, जगावर प्रलय ओढवून घेण्याची सोपी युक्ति आहे. ती म्हणजे, ध्रुवप्रदेशावर अणुबॉम्ब टाकणें. असें करण्यांत आल्यास समुद्रांतील पाण्याची पातळी वाढून लक्षावधि लोक बुडून मरतील.

**छोट्या उद्योगधंद्यांना साह्य**—मद्रास सरकारनें छोट्या उद्योगधंद्यांना साह्य करण्याठी म्हणून शहराच्या सीमेंत एक इंडस्ट्रिअल एस्टेट स्थापन करण्याची योजना तयार केली आहे. योजनेसाठी २० कोटी रुपये खर्च येणार असून ज्या छोट्या धंदेवाल्यांना शहरांत जागा मिळणें अगर भांडवल जमा करणें अवघड जात असेल, त्यांना मदत देण्यांत येणार आहे.

**कायदे बनविणारावर आरोप**—सुप्रीम कोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. पतंजलीशास्त्री ह्यांनीं कायदे बनविणारावर आणि आर्थिक नियोजन करणाऱ्यावर असा आरोप केला आहे. कीं त्यांनीं एकत्र कुटुंबपद्धति मोडकळीस आणली आहे. ही पद्धति संपुष्टांत आल्यामुळें मुलींना उदरभरणाचा स्वतंत्र मार्ग शोधावा लागत आहे, असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**बँकांकडे कर्जाची मागणी**—मध्य-प्रदेश सरकारचे अर्थमंत्री, श्री. ब्रिजलाल बियाणी, ह्यांनीं नागपूरमध्यें बँकर्सची एक बैठक बोलाविली आहे. राज्याचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी राज्य सरकारला लागणाऱ्या रकमेंत १ कोटीची तूट भासत आहे. तेवढी रक्कम बँकांकडून मिळविण्याचा त्यांचा विचार आहे. पंजाब नॅशनल बँकेनें १२·५ लाख रुपये कर्ज देण्याचें कबूल केलें आहे, असें समजतें.

**सार्वजनिक रेडिओ**—शाळा, कॉलिजें आणि ज्या गांवांतून पंचायती आहेत अशीं गांवें ह्या सर्व ठिकाणीं पुढील पांच वर्षांत सार्वजनिक रेडिओ ठेवण्यांत येणार असल्याचें समजतें. ह्या कामासाठी दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ५०० कोटी रुपयांची सोय करण्यांत येणार आहे.

**जबलपूर येथील मेडिकल कॉलेज**—जबलपूर येथें नव्यानें काढण्यांत येणाऱ्या मेडिकल कॉलेजच्या इमारतीचा नकाशा तयार झाला आहे. इमारतीच्या बांधकामास ३·५ कोटी रुपये खर्च येईल. प्रत्यक्ष कामास लवकरच सुरवात होईल. तूर्त कॉलेजचे वर्ग महाकोशल महाविद्यालयाच्या एका भागांत भरविण्यांत येतील.

**खोल समुद्रांतील मच्छीमारी**— भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील मुंबई ते सौराष्ट्रपर्यंतच्या सागरापैकीं १७,००० चौरस मैलांची मच्छीमारीच्या धंद्याच्या अनुकूलतेच्या दृष्टीनें पहाणी करण्यांत आली आहे. अशाच प्रकारची पहाणी त्रावणकोर-कोचीन नजीकच्या व पश्चिम बंगाल नजीकच्या समुद्रावर करण्यांत येणार आहे.

**आंध्र सरकारचा विरोध**—राज्या-राज्यांत होणाऱ्या व्यापारी उलाढालींवरील विक्रीकराचें उत्पन्न सोडून देण्यास आंध्र सरकारनें आपला विरोध दर्शविला आहे. आंध्र राज्याला ह्या करामुळें दरवर्षी ४० लाख रुपयांचें उत्पन्न होतें.

**साखर कामगारांना बोनस**—टिळकनगरच्या महाराष्ट्र शुगर मिल्सच्या २,५०० कामगारांना १९५३–५४ सालचा बोनस म्हणून ३ लाख रुपये देण्यांत येणार आहेत. कारखान्याचे चालक व कामगार-संघ ह्यांच्यांत तडजोड झाल्यामुळें प्रत्येक कायम कामगाराला तीन महिन्यांचा पगार बोनसच्या रूपानें मिळणार आहे.

**अविकसित राष्ट्रांसाठी अणुशक्ति**—जिनीव्हा येथें भरलेल्या अणुशास्त्रज्ञांच्या परिषदेंत अविकसित राष्ट्रांत अणुशक्तीच्या साह्यानें वीज-उत्पत्तीचीं केंद्रें स्थापन करण्याचा विचार करण्यांत आला. अशा केंद्रांना रेल्वे, रस्ता, अगर भूस्तरविषयक पहाणी ह्यांची जरूरी लागत नसल्यानें ह्या देशांना तीं अधिक योग्य आहेत, असें म्हणतात.

**जकार्ता येथील विमानांचें प्रदर्शन**—इंडोनेशिआच्या १० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त जकार्ता येथें विमानांचें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन ता. १८ ऑगस्ट पासून भरणार आहे. प्रदर्शनांत हिंदुस्थान एअर क्राफ्ट कंपनीनें बनविलेलें एच २ हें विमान ठेवण्यांत येणार आहे.

## जिनीव्हा येथील अणुशास्त्रज्ञांची परिषद्

अणुशक्तीचा उपयोग मनुष्याच्या हितासाठी कसा करतां येईल ह्या विषयाचा विचार करण्यासाठी जिनीव्हा येथें जगांतील अणुशास्त्रज्ञांची परिषद् भरली आहे. परिषदेंत भाग घेण्यासाठी निरनिराळया ७२ देशांतील १,००० प्रमुख शास्त्रज्ञ आले आहेत. अध्यक्षपदाचा मान भारताचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. भाभा ह्यांना देण्यांत आलेला आहे. शास्त्रज्ञांखेरीज अनेक देशांचे तंत्रज्ञ, व व्यापारी व सांस्कृतिक संघटनांचे प्रतिनिधीहि जिनीव्हाला गेले आहेत. त्यांतच चार–पांचशें वृत्तपत्रप्रतिनिधींची भर पडली असल्यानें जिनीव्हा शहरांत परिषदेच्या निमित्तानें ३,००० लोकांचा मेळावा जमला आहे. ३० देशांच्या प्रतिनिधि-मंडळांतर्फे सुमारें १,००० निबंध धाडण्यांत आले आहेत. त्यांपैकी ४६० निबंधांच्या प्रमुख भागांचें वाचन करण्यांत येणार आहे. भारताच्या प्रतिनिधींनीं १४ निबंध धाडले असून त्यांपैकी ९ निबंधांचें वाचन केलें जाईल. परिषदेंत भाग घेणाऱ्या राष्ट्रांनीं अणुशक्तीचा शांततामय उपयोग दाखविणारी कांहीं यंत्रसामुग्री नमुन्यादाखल नेलेली आहेच. पण त्याशिवाय कांहीं खाजगी कंपन्यांनींहि अशा प्रकारचें कांहीं साहित्य प्रदर्शनासाठी म्हणून नेलेलें आहे. अणुशक्तीचा शांततामय उपयोग करण्याविषयीं जे निबंध आले आहेत त्यांपैकी बरेचसे निबंध अमेरिका, रशिआ व ब्रिटन ह्या देशांतील शास्त्रज्ञांकडून आलेले आहेत. माहितीची देवाण-घेवाण खुल्या दिलानें होत असली तरी लष्करी गौप्यांच्या बाबतींत अजूनहि हातचें राखलें जाईल, हें उघडच आहे.

---

## उसाच्या लागवडींत ८·९% वाढ

भारतांत १९५५–५६ या चालू हंगामांत ३९,७०,००० एकर विभागांत उसाची लागवड झाली असावी, असा मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्याच्या अर्थ आणि आंकडेवारी विभागांचा या पिकाचा पहिला अंदाज आहे. १९५४–५५ चा हा आंकडा ३६,४७,००० एकर होता. यावरून यंदा लागवडीच्या क्षेत्रांत ३,२६,००० एकर अथवा ८·९ टक्के वाढ झाल्यांचें दिसून येतें. उत्तर प्रदेश, पंजाब, प. बंगाल, राजस्थान, मध्यभारत व सौराष्ट्र राज्यांत या पिकांच्या लागवडींत वाढ झाली असून अनुकूल हवामान व गतवर्षीपेक्षा पाणीपुरवठ्याच्या सोयींत वाढ या गोष्टी त्यास कारणीभूत आहेत. तथापि बिहार, मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यांत या पिकाच्या लागवडींत घट झाली आहे. हा अंदाज सर्वसाधारणतः जून १९५५ च्या मध्यापर्यंतचा आहे. तोंपर्यंत या पिकांची परिस्थिति सामान्यतः समाधानकारक होती.


---

## 'रवि' आणि 'शशी' मॉस्कोकडे रवाना

भारताच्या पंतप्रधानांनीं रशियांतील मुलांना हत्तींचीं दोन पिलें भेटीदाखल दिलीं आहेत. त्यांपैकी 'रवी'चें वय १५ महिन्यांचें असून 'शशी'चें वय ११ महिन्यांचें आहे. 'रवी'चा जन्म म्हैसूरमधला असून 'शशी'चा जन्म कूर्गमधला आहे. 'स्ट्रॅव्हरोपोल' ह्या रशियन जहाजांतून तीं गेल्या शुक्रवारीं मुंबईहून रवाना झालीं. भारत सरकारतर्फे, जहाजाच्या कप्तानाच्या हातीं तीं मोठ्या समारंभानें देण्यांत आलीं. दोन हिंदी पशुवैद्य जहाजावर त्यांची काळजी वहातील. बरोबर दोन माहूत आहेतच. हत्तींच्या पिलांसाठी तांदूळ, गाजरे, बटाटे, ऊंस, इत्यादि ३½ टन खाद्यपदार्थ जहाजावर चढविण्यांत आले आहेत.


किर्लोस्कर

शेंगायंत्रें



कल्याण शेंगायंत्र

कल्याण पॉवर शेंगायंत्र चालविण्यास ६–८ अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दर एक तासास ७५–८० पोतीं शेंग फोडली जाते.

—अधिक माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लक्ष रु. |
| रिझर्वस् व इतर फंडस् | ५¾ लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | सव्वा कोटीवर |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ०–८–० |
| सेव्हिंग ... ... | रु. १–८–० |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २–०–० |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३–०–० |
| २ वर्षें मुदत ... | रु. ३–४–० |
| ३ वर्षें मुदत ... | रु. ३–८–० |
| ४ वर्षें मुदत ... | रु. ३-१२-० |
| ५ वर्षें मुदत ... | रु. ४–०–० |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १७ ऑगस्ट, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपन्यांचे जन्म-मृत्यु

१९५४-५५ मध्यें नव्या लिमिटेड कंपन्या पुष्कळ निघाल्या तरी बुडालेल्या कंपन्यांची संख्याहि मोठी होती. त्या वर्षी २२६ कोटी रुपये अधिकृत भांडवलाच्या १२०३ कंपन्या नोंदण्यांत आल्या व ७·८२ कोटी रुपये वसूल भांडवलाच्या ९२४ कंपन्या लिक्विडेशनमध्यें गेल्या. ह्या १२०३ कंपन्यांपैकी २१९ पब्लिक कंपन्या होत्या व बाकीच्या ९८४ प्रायव्हेट कंपन्या होत्या. पब्लिक कंपन्यांचें अधिकृत भांडवल १७४·९ कोटी रु. होतें, तर खासगी कंपन्यांचें अधिकृत भांडवल ५१·१ कोटी रु. होतें. म्हणजे नवीन पब्लिक कंपनीचें सरासरी अधिकृत भांडवल ७९,५१,००० रु. होतें, तर खासगी कंपनीचें तें ५,१९,००० रु. होतें. १९५३-५४ चे तत्सम आकडे अनुक्रमें ११,२५,००० रु. व ३,३१,००० रु. असे होते.

### नव्या कंपन्यांची छाननी

१९५३-५४ मध्यें उभारलेल्या पब्लिक कंपन्यांपैकी ४२ कंपन्यांचें अधिकृत भांडवल प्रत्येकी १ कोटी रुपयांपेक्षा अधिक होतें. त्या सर्वांत दुर्गापूर आयर्न अँड स्टील वर्क्सचा अनुक्रम पहिला लागतो. त्याचें अधिकृत भांडवल ५० कोटी रु. आहे. त्याचे खालोखाल २५ कोटी अधिकृत भांडवलाच्या इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचा अनुक्रम लागतो. सरकार पुरस्कृत भारत इलेक्ट्रॉनिक्स आणि नॅशनल इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ह्यांचा त्यांचे खालोखाल अनुक्रम येतो. ४२ बड्या पब्लिक कंपन्यांचें मिळून अधिकृत भांडवल १७८ कोटी रु. असून, सर्वच्या सर्व १२०३ कंपन्यांच्या अधिकृत भांडवलाच्या तें ८०% इतकें भरतें.

### १९५३-५४ मध्यें लिक्विडेशनमध्यें गेलेल्या कंपन्या

| गट | संख्या | वसूल भांडवल (लक्ष रु.) |
|---|---|---|
| बँकिंग, विमा | ७० | ६५ |
| वहातुक | ९४ | २१३ |
| व्यापार, उत्पादन | ५५८ | २७७ |
| मिल्स, प्रेसेस | ६८ | १३७ |
| चहा इतर मळे | १२ | १८ |
| खाणी | १७ | २३ |
| एस्टेट, जमीन, इमारती | १६ | १९ |
| डिस्टिलरीज | ४ | २ |
| साखर | १ | १ |
| होटेल्स, थिएटरें | ७६ | २६ |
| इतर | ८ | १ |
| एकूण | ९२४ | ७८२ |

### लिक्विडेशनमध्यें गेलेल्या कंपन्यांचीं जन्मवर्षें

लिक्विडेशनमध्यें गेलेल्या कंपन्या केव्हां नोंदलेल्या होत्या हें पाहिलें, तर एकूण ९२४ पैकी १२२ कंपन्या ३१ मार्च, १९४० पूर्वी, म्हणजे मंदीच्या काळांत स्थापन झालेल्या होत्या, आणि २०७ कंपन्या १९४०-४५ ह्या मुदतींत, म्हणजे युद्धकालीन चलतींत निघालेल्या होत्या.

| नोंदणीची तारीख | १९५४-५५ मध्यें लिक्विडेशनमध्यें गेलेल्या कंपन्या |
|---|---|
| १ एप्रिल १९०० पूर्वी (१ एप्रिल ते ३१ मार्च) | ४ |
| १९०० ते १९१० | ० |
| १९१० ते १९२० | ३ |
| १९२० ते १९३० | १७ |
| १९३० ते १९३५ | २७ |
| १९३५ ते १९४० | ७१ |
| १९४० ते १९४५ | २०७ |
| १९४५ ते १९४६ | ९६ |
| १९४६ ते १९४७ | १२७ |
| १९४७ ते १९४८ | ७३ |
| १९४८ ते १९४९ | ८६ |
| १९५० ते १९५१ | ६८ |
| १९५१ ते १९५२ | ६४ |
| १९५२ ते १९५३ | ३० |
| १९५३ ते १९५४ | ९ |
| १९५४ ते १९५५ | १ |
| एकूण | ९२४ |

### वसूल भांडवलांत वाढ

बँका आणि विमा कंपन्या वगळून बाकीच्या कंपन्यांनीं १९५३-५४ मध्यें आपलें वसूल भांडवल चांगल्या तऱ्हेनें वाढविलें. नवे शेअर्स विकून किंवा बोनस शेअर्स देऊन हें साध्य करण्यांत आलें. वसूल भांडवलांत ३७·१६ लक्ष रुपयांची भर पडली, त्यापैकीं २०·९३ लक्ष रुपयांची म्हणजे ५६% ची भर मुंबई राज्यांतील कंपन्यांनीं घातली.

### चालू कंपन्या

३१ मार्च, १९५५ रोजीं भारतांत एकूण २९,८२७ कंपन्या चालू होत्या व त्यांचें वसूल भांडवल ९७९ कोटी रुपये होतें.

### कलकत्ता येथील किर्लोस्कर शो-रूमचें उद्घाटन

किर्लोस्कर संघटनेच्या कलकत्ता येथील 'किर्लोस्कर शो-रूम'चें उद्घाटन शनिवार, दि. २० ऑगस्ट रोजीं २९, गणशेचंद्र अव्हेन्यू, येथें प. बंगालचे मुख्य मंत्री डॉ. बी. सी. रॉय ह्यांच्या हस्तें होणार आहे.

## रेल्वेंतून फुकट जाणारे प्रवासी

भारतीय रेल्वेंतून फुकट प्रवास करणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे. अशा प्रवाशांना पकडण्यासाठं दक्षिण आणि मध्य-रेल्वेच्या उपनगरांतून धांवणाऱ्या भागावर साध्या पोषाकांतील तिकिट–तपासनीस ठेवण्यांत आले होते. ह्या उपायाचा चांगला परिणाम झाल्याचें समजतें. मामुली तिकिट-तपासनिसांचा पोषाख फुकट्या प्रवाशांच्या परिचयाचा असल्यामुळें ते त्यांना सहज चुकवूं शकतात. अशा प्रकारचे उपाय योजले जात असले तरी फुकट्या प्रवाशांची संख्या चिंता उत्पन्न करण्याइतकी मोठी आहे. १९५४–५५ सालीं सुमारें ७६,००,००० लोकांना विना-तिकिट प्रवास करतांना पकडण्यांत आलें. त्यापैकीं बहुतेक प्रवाशांनीं आपलें भाडें चुकतें केलें. पण, २,१४,००० मुशा-फिरांवर मात्र खटले करावे लागले. भारतीय रेल्वे-अधिकाऱ्यांचें एक प्रतिनिधिमंडळ गेल्या वर्षी रशिआचा व इतर कांहीं युरोपियन देशांचा दौरा करून आलें आहे. मंडळानें केलेल्या शिफारसीप्रमाणें कांहीं महिन्यापूर्वी भारतीय रेल्वे मार्गावरील महत्त्वाच्या प्रत्येक गाडीवर दोन डब्यामागें एक प्रवासी तिकिट-तपासनीस नेमण्यांत आला. हा प्रयोग बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झाल्यामुळें आणखीहि कांहीं गाड्यांवर प्रवासी तिकिट-तपासनीस नेमण्याचा विचार करण्यांत येत आहे. ह्याशिवाय आणखीहि कांहीं उपाय योजण्यांत येत असल्याचें कळतें. भारतामधील सर्व रेल्वे मार्गावर मिळून रोज २०,००० पेक्षांहि अधिक प्रवासी तिकिट काढल्यावांचून प्रवास करतात असा अंदाज आहे. त्यांच्या विरुद्ध मोहीमच काढण्यांत येत आहे.

---

## आशिआच्या विकासासाठी अमेरिकन मदत

अमेरिकन काँग्रेसनें कांहीं दिवसांपूर्वी आशिआच्या आर्थिक विकासासाठी १० कोटी डॉलर्सची रक्कम मंजूर केली आहे. ह्या निधींतून बऱ्याच आशिआई राष्ट्रांना मदत मिळणार आहे. त्याचप्रमाणें भारतालाहि कांहीं वांटा मिळणार आहे असें समजतें. आशिआ खंडाच्या निरनिराळ्या भागांची औद्योगिक भरभराट करण्यासाठी अमेरिकेच्या प्रेसिडेंटनें हा खास फंड काढला आहे. ह्या फंडांतून भारताला कांहीं मिळणार नाहीं अशा वार्ता पूर्वी आलेल्या होत्या. भारताला जास्तींत जास्त ५ कोटी डॉलर्सचें आर्थिक साह्य द्यावें अशी मर्यादा काँग्रेसनें घातली होती असें म्हणतात. भारताला देण्यांत यावयाच्या आर्थिक मदतीवर मर्यादा घालण्यांत यावी अशा मताचा पाठपुरावा कांहीं दिवसांपूर्वी करण्यांत येत होता. पण आतां अशी मर्यादा घालण्याचें काँग्रेसनें नाकारलें आहे. अमेरिकन सरकारनें भारताच्या विकासासाठी चालू वर्षासाठी म्हणून ७ कोटी डॉलर्सची मागणी केली होती. ती मात्र ५ कोटी डॉलर्सवर आणून ठेवण्यांत आली. तथापि तांत्रिक साह्यासाठी देण्यांत यावयाच्या १·५ कोटी डॉलर्सच्या रकमेंत मात्र कांहीं कपात करण्यांत आलेली नाहीं. आशिआच्या विकासासाठी मंजूर करण्यांत आलेल्या १० कोटी डॉलर्सपैकी कोणत्याहि एका देशाला २५ टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम देण्यांत येऊं नये असें ठरविण्यांत आलें म्हणजे भारताला ह्या फंडांतून अधिकांत अधिक २·५ कोटी डॉलर्स मिळू शकतील.

---

**वाडीबंदरची पुनर्घटना**—मुंबईमधील वाडीबंदर ह्या माल-वहातुकीच्या स्टेशनाची पुनर्घटना करण्यांत येत आहे. त्यासाठी २८ लाख रुपये खर्च होईल. पुनर्घटना पूर्ण झाल्यावर रोज २०० ऐवजीं ३०० वॅगन्स रिकाम्या करतां येतील.

## मुंबई सरकारच्या आरोग्य-योजना

मुंबई सरकारनें राज्यांतील कांहीं जिल्ह्यांतून स्त्रियांच्या व मुलांच्या आरोग्याकडे लक्ष पुरविण्यासाठी १६१ आरोग्य केंद्रें स्थापन करण्याची योजना तयार केली आहे. ह्या योजनेला मध्यवर्ती सरकार, जागतिक आरोग्य–संघटना आणि संयुक्त राष्ट्र–संघटनेच्या शास्त्रीय शाखेचें साह्यहि लाभणार आहे. योजनेचा अंमलबजावणीचा काळ २ वर्षांचा राहील. संकल्पित आरोग्य केंद्रांतील सोईचा फायदा सुमारें ३२,२०,००० लोकांना मिळेल असा अंदाज आहे. योजनेप्रमाणें बडोदें जिल्ह्यांत अशा प्रकारचीं ४० केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत व पुणें जिल्ह्यांत ३८ केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. राज्यांतील उरलेल्या २५ जिल्ह्यांत प्रत्येकी दोन केंद्रें स्थापन करण्यांत येतील. प्रत्येक केंद्राचा उपयोग सुमारें २०,००० लोकांना होईल. योजना अंमलांत आणण्यासाठी भारतीय सरकार ६ कोटी रुपये देईल असें समजतें. स्वतः मुंबई सरकार ह्या कामासाठी १० लाख रुपये खर्च करणार आहे. संयुक्त–राष्ट्रसंघटनेची सांस्कृतिक व शास्त्रीय शाखा जरूर तीं उपकरणें, औषधें आणि वहातुकींची सोय करणार आहेत. शाखेकडून योजनेसाठी जवळ जवळ २,०५,००० डॉलर्स किंमतीचीं साधनें पुरविलीं जाणार आहेत. जागतिक आरोग्य संघटनेतर्फे एक अनुभवी अधिकारी ह्या कामासाठी येणार असून त्याला मदत करण्यासाठी दोन परिचारिकाहि देण्यांत येतील.

---


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ७,७५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ५,२५,००,००० |

★ या बँकेच्या सर्व शाखांवर व हिंदुस्थानांतील प्रमुख व्यापारी शहरांवर ड्राफ्टस दिले जातात.

★ देशांतील बहुतेक प्रमुख शहरीं बिलें वसुलीची माफक दरांत व्यवस्था केली आहे.

★ हेड ऑफिस, डेक्कन जिमखाना (पुणें), सोलापूर, नाशिक, अहमदनगर व श्रीरामपूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची सोय आहे.

मुख्य कचेरीः– थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

## शेतीच्या उत्पादनांत वाढ व त्याचे परिणाम

अन्नधान्याच्या परिस्थितींत गेल्या तीन वर्षांमध्यें क्रांति झाली आहे. शेतकी उत्पादनांत वाढ झाली आहे आणि धान्य विकत घ्यावयाचें म्हटलें तर तें मुबलक विकत घेतां येतें या अर्थानें आपला अन्नप्रश्न सुटला आहे. कापूस, गळित धान्यें, आणि साखर ह्यांबाबत येणारी तूट जवळ जवळ भरून आली असून सबंध आर्थिक वातावरण बदलून गेलें आहे व भांडवल गुंतविण्यास आणि धंदे काढण्यास पोषक झालें आहे. अन्नखात्यानें अवलंबिलेलीं नवीं तंत्रें आणि घेतलेला नवा पवित्रा यांचें हें फळ आहे.

महत्त्वाचीं अन्नधान्य पिकें आणि इतर पिकें यांचें १९४९-५० ते १९५४-५५ मधील उत्पादन खालील तक्त्यांत दिलें आहे.

| वर्ष | उत्पादन | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अन्नधान्यें (दशलक्ष टनांत) + | कपाशी (लक्ष गांसड्या) | ताग (लक्ष गांसड्या) | गळित धान्यें * (लक्ष टन) | ऊंस (लक्ष टन) |
| १९४९-५० | ४६·० | २६·३ | ३०·९ | ५१·४ | ४९·४ |
| १९५०-५१ | ४१·७ | २९·१ | ३२·८ | ५०·८ | ५६·२ |
| १९५१-५२ | ४२·९ | ३१·३ | ४६·८ | ४९·५ | ६०·७ |
| १९५२-५३ | ४९·२ | ३१·९ | ४५·९ | ४६·६ | ३०·२ |
| १९५३-५४ | ५८·० | ३९·७ | ३१·३ | ५४·६ | ४३·९ |
| १९५४-५५ | ५५·३ | ४३·० | ३१·५ | ५८·८ | ५४·६ |

+ या आंकड्यांत तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, गहूं, बार्ली व इतर किरकोळ अन्नधान्यांच्या उत्पादनाचा समावेश आहे.

* या आंकड्यांत भुईमूग, एरंडी, तीळ, मोहरी, शिरद् आणि अळशीच्या उत्पादनाचा समावेश आहे.

ताग आणि ऊंस हीं पिकें वगळलीं तर इतर पिकांच्या बाबतींत पहिल्या पंचवार्षिक योजनेंत संकल्पिलेलीं उत्पादनाचीं लक्ष्यें साध्य झालीं ही गोष्ट विचारांत घेण्याजोगी आहे. १९५५-५६ साठी अन्नधान्य उत्पादनाचें ५२·५ दशलक्ष लक्ष्य टन ठरविण्यांत आलें होतें. परंतु १९५३-५४ मध्यें ५८ दशलक्ष टन म्हणजे ठरविलेल्या लक्ष्यापेक्षा ५·५ दशलक्ष टन जास्त झालें. अजूनपर्यंतच्या उत्पादनांत हा उच्चांक आहे. भातशेतीच्या नव्या पद्धतीखालील क्षेत्रांत पुष्कळ वाढ झाल्यामुळें हें भाग्य आपल्या वांट्याला आलें ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्याजोगी आहे. १९५४-५५ मध्यें प. भारतांत आलेले अभूतपूर्व पूर आणि अवर्षणामुळें १९५३-५४ मधील उत्पादनापेक्षा जरा या वर्षी उत्पादन २·७ दशलक्ष टनांनीं कमी झालें असलें तरीसुद्धां १९५५-५६ सालीं ठरविलेल्या लक्ष्यांपेक्षा तें २·८ टनांनीं जास्तच आहे.

या वर्षी उसाच्या उत्पादनांत मोठ्या प्रमाणांत झालेली वाढ ही दुसरी एक उल्लेखनीय गोष्ट आहे. १९५३-५४ पेक्षा उसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत सुमारें १० टक्के वाढ करून उसाचें उत्पादन मात्र सरासरी २४ टक्क्यांहून अधिक वाढविण्यांत यश मिळविलेलें आहे.

### अधिक उत्पादनाचे परिणाम

१९५०-५१ सालीं देश जेव्हां दुष्काळाच्या तोंडाशीं होता त्या परिस्थितीशीं हल्लींच्या परिस्थितीची तुलना केल्यास अन्नधान्याच्या आणि शेतीच्या क्षेत्रांत झालेल्या प्रगतीची यथार्थ कल्पना येईल. सध्यां कोठल्याहि अन्नधान्यावर नियंत्रण नाहीं. दोन वर्षांपूर्वी अशी परिस्थिति कल्पनेच्या पलीकडे होती. १९५१ मध्यें ४·७ दशलक्ष टन धान्य आयात झालें तर १९५४ मध्यें फक्त ०·८ दशलक्ष टन आयात झालें. आज जें धान्य आयात करण्यांत येत आहे तें देशांतील अन्नविषयक गरजा भागविण्यासाठीं नसून देशांत पुरेसा राखीव सांठा तयार करण्यासाठींच आहे.

दुसरें म्हणजे अन्नधान्यें मुबलक मिळूं लागल्यामुळें भावविषयक परिस्थिति सुधारली आहे. कित्येक ठिकाणीं तर किंमती तोट्यांत पडण्याइतक्या घसरल्या. त्यामुळें किंमती सुधारण्यासाठीं पुष्कळ उपाय योजणें आवश्यक झालें.

कापसाच्या आणि गळित धान्याच्या उत्पादनांत वाढ झाल्यामुळें खुली निर्यात करूं देण्याजोगी परिस्थिति निर्माण झाली. तथापि गेल्या दोन वर्षांमध्यें साखरेच्या खपाचें प्रमाण वाढल्यामुळें ती मात्र बऱ्याच प्रमाणांत परदेशांहून आयात करून गरज भागविणें भाग पडलें.

### भविष्यकालासाठीं नियोजन

या वर्षी अन्नाच्या बाबतींत आपण जवळजवळ स्वयंपूर्ण झालों असलों तरी वाढती लोकसंख्या, हवामानविषयक परिस्थिति, आणि पाऊसपाणी नीट न होण्याची शक्यता इत्यादि गोष्टींमुळें ही परिस्थिति अशीच कायम राहील अशी खात्री देतां येत नाहीं. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीनंतर राष्ट्रांत उत्पन्नांत वाढ होऊन दर डोई खपांत वाढ होण्याची शक्यता आहे आणि दुसरें म्हणजे आहारांतील समतोलपणा कायम ठेवणाऱ्या संरक्षित अन्नाच्या उत्पादनाचें लक्ष्य १९६०-६१ पर्यंतहि शक्य होण्याचा संभव नसल्यामुळें वाढलेल्या खपासाठीं अधिक धान्याचा पुरवठा करावा लागेल.

अन्नधान्यांच्या उत्पादनाच्या वाढीबरोबर कापूस, गळित धान्यें, साखर, तंबाखू, नारळ, सुपारी, लाख, मिरी आणि काजूगर या पिकांच्या उत्पादनाच्या वाढीवरहि जास्त लक्ष दिलें पाहिजे. कारण राहणीमानाचा दर्जा उंचावला कीं यांच्या गरजा वाढण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणें आपला विषम आहार सुधारण्यासाठीं पूरक अन्नें आणि दूध, मांस, मासे, फळें यांसारख्या संरक्षित अन्नांचा पुरवठा करावा लागेल. घरें आणि उद्योगधंदे यांना लागणारें इमारती लांकूड आणि बांधकामाचें साहित्य यांचेंहि उत्पादन आपणांला करतां आलें पाहिजे. शेतकीमध्यें विविधता आणल्यावर या गोष्टी साध्य होतील.

### जादा धान्यामुळें उत्पन्न होणारा प्रश्न

शेतकी उत्पादनामुळें जसा संतोष होतो तशीच त्यामुळें काळजीहि उत्पन्न होते हें येथें सांगणें उचित ठरेल. या वर्षी अन्नाच्या तीव्र टंचाईची परिस्थिति संपली आणि जादा अन्नधान्याचा प्रश्न पुढें येऊन राहिला.

वरील परिस्थितीस पुढील तीन प्रकारांनीं तोंड देतां येईल. उत्पादनावर नियंत्रण ठेवणें, निर्यात व्यापारांत वाढ करणें किंवा देशांतील खपाला उत्तेजन देणें. लक्षावधी लोक अर्धपोटीं आहेत अशा परिस्थितींत उत्पादनावर नियंत्रण ठेवणें उचित होणार नाहीं. त्यामुळें निर्यात वाढविण्याच्या आणि देशांतील खपाला उत्तेजन देण्याच्या दिशेनें आपण प्रयत्न केले पाहिजेत. खप वाढावा म्हणून किरकोळ किंमती उतरण्यासाठीं अनेक उपाय योजण्यांत आले असले तरी खप कमी असलेल्या प्रदेशांत अनेकांना रोजगार मिळण्याजोग्या योजना सुरू करण्याचीहि गरज आहे. कारण अशा योजनांमुळें तेथील जनतेची क्रयशक्ति वाढून ते अधिक प्रमाणांत धान्य खरेदी करूं शकतील. जागतिक संघटनेच्या प्रतिवृत्तांत सुचविलेल्या अशाच स्वरूपाच्या उपायांवर भारत सरकार सध्यां विचार करीत आहे.

## हिंदी बँकांचे १९५४ विषयक आकडे

### प्रगतीचे निदर्शक

बँकांच्या ताळेबंदांतील आंकड्यांवरून तयार केलेलें " बँकांविषयीं आंकडेवार तक्ते " हें रिझर्व्ह बँकेचें १९५४ सालासंबंधीं वार्षिक प्रकाशन नुकतेंच बाहेर पडलें आहे. भारतांतील हिंदी व विदेशी बँकांच्या सुधारत चाललेल्या परिस्थितीवर त्यानें उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे.

### ठेवींत वाढ

१९५४ मध्यें बँकांकडील ठेवी वाढल्या, त्याचप्रमाणें त्यांनीं दिलेलीं कर्जें व गुंतविलेल्या रकमा ह्यांतहि भर पडली. १९५३ मध्यें १९५२ च्या मानानें ७ कोटींनीं ठेवी वाढल्या होत्या; १९५४ मध्यें त्यांत आणखी ९३ कोटींची वाढ झाली. ह्या ९३ कोटींत शेड्यूल्ड बँकांचा वाटा ८९ कोटींचा व बिगर शेड्यूल्ड बँकांचा वाटा ४ कोटींचा आहे. सहकारी बँकांकडेहि १३ कोटींच्या जास्त ठेवी होत्या.

**बँकांकडील ठेवी ( कोटी रु. )**

| | व्यापारी बँका | सहकारी बँका |
|---|---|---|
| १९४८ | १११८ | ७२ |
| १९४९ | ९९७ | ८७ |
| १९५० | १००१ | ९० |
| १९५१ | ९८८ | १०१ |
| १९५२ | ९५४ | १०६ |
| १९५३ | ९६९ | ११५ |
| १९५४ | १०६२ | १२८ |

### कचेऱ्यांत वाढ

१९५४ मध्यें व्यापारी बँकांच्या कचेऱ्यांत २२ ची भर पडली. १९५३ मध्यें कचेऱ्यांची संख्या ३३ नें कमी झाली होती. एकूण बँकांची संख्या २३ नें कमी झाली असली तरी कचेऱ्यांची संख्या वाढलेली आहे. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ८४ ची वाढ व बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ६२ ची घट, म्हणजे एकूण २२ ची वाढ, असा हिशेब झाला. सहकारी बँका व त्यांच्या कचेऱ्या, ह्यांच्यांत मात्र एकसारखी वाढ होत आहे.

**बँकांची वर्गवारी ( व्यापारी व सहकारी )**

| बँकेच्या ठिकाणची लोकसंख्या | बँककचेऱ्या | प्रत्येक कचेरीमागें लोकसंख्या |
|---|---|---|
| १० लक्षांवर | ४३८ | १५,५६६ |
| ५ ते १० लक्ष | २८३ | १६,२२९ |
| २ ते ५ लक्ष | ४१२ | १७,३४८ |
| १ ते २ लक्ष | ४९३ | ११,९१० |
| ७५ ह. ते १ लक्ष | १५४ | १३,६६० |
| ५० ह. ते ७५ ह. | ४६७ | १०,०८५ |
| २५ ते ५० ह. | ७०३ | ९,९९३ |
| १० ते २५ ह. | ११२६ | ७,८७६ |
| ५ ते १० ह. | ४९७ | ५,२३४ |
| ५ ह. खालीं | २५६ | २,७५६ |
| एकूण | ४,७८९ | १०,४४९ |
| इतर | १४९ | |

### कचेऱ्यांचें लोकसंख्येशीं प्रमाण

वरील आंकड्यांवरून दिसून येईल कीं, ज्या ठिकाणीं बँककचेरी आहे अशा ठिकाणीं सरासरीनें प्रत्येक १०,४४९ लोकसंख्येस एक बँक कचेरी असें प्रमाण पडतें. सबंध भारतांत फक्त १६१३ गांवांतून ( बँका-व्यापारी किंवा सहकारी ) आहेत. इतर ठिकाणचीं लोकसंख्याहि हिशेबांत घेतली, तर ७५,००० लोकवस्तीस एक बँककचेरी, असें प्रमाण आढळतें. शेड्यूल्ड बँकांच्या ५५% कचेऱ्या ५० हजारांपेक्षा अधिक लोकवस्तीच्या ठिकाणींच होत्या.

### उत्पन्न खर्च

१९५३ च्या मानानें १९५४ मध्यें हिंदी शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न २·८ कोटींनीं वाढलें व खर्चहि २·४ कोटींनीं वाढला. एक्सचेंज बँकांचें उत्पन्न २५ लाखांनीं घटलें व त्यांचा खर्चहि १० लाखांनीं कमी झाला. खर्चाचें उत्पन्नाशीं प्रमाण हिंदी शेड्यूल्ड बँकांचे बाबतींत ८०%, एक्सचेंज बँकांचे बाबतींत ७८% व बिगर शेड्यूल्ड बँकांचे बाबतींत ७९% पडलें.

---

### जननाच्या प्रमाणांत घट

भारतांतील जननाचें प्रमाण उतरत चाललें आहे. १९४०–५० ह्या दहा वर्षांत हें प्रमाण दर हजारीं ३९·९ पासून २७·५ पर्यंत खालीं आलें आहे. आसाममधील उतार २९·५ पासून १४·८ पर्यंत एवढा मोठा आहे. मुंबईमधील प्रमाण ३४.५ ते ३३·३ ह्याप्रमाणें स्थिर आहे. अखंड पंजाबांत युद्धापूर्वीं ३८·९ असें प्रमाण होतें, तें १९५२ मध्यें ४१ झालें; म्हणजे वाढलें.

---

**(नियोजित) कृष्णा सहकारी साखर कारखाना, लिमिटेड, ( जुळेवाडी ) रेठरेबु॥ जि. उ. सातारा**

वरील सहकारी साखर कारखान्याची पहिली सर्वसाधारण सभा श्री. एल्. एस्. लुला आय्. ए. एस्., कलेक्टर उत्तर सातारा, यांचे अध्यक्षतेखालीं दि. १३–८–१९५५ रोजीं शनिवारीं दुपारीं २॥ वाजतां, शेणोली स्टेशन येथील श्री. माधवराव मोहिते यांचे वखारींत भरली होती.

---

**भंडारा येथें दारूगोळ्याचा कारखाना**— नागपूरपासून ४० मैलांवर असलेल्या भंडारा ह्या ठिकाणीं दारूगोळ्याचा नवा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीसाठीं २५ कोटी रुपये खर्च येईल. कारखान्यासाठीं लागणाऱ्या जागेची निवड करण्यासाठीं पहाणी करण्यांत येत होती. ती आतां पुरी झाली आहे.

**जपानहि मागें नाहीं**—टोकिओ विद्यापीठांतील प्रोफेसर इटोकावा ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, १९५८ च्या सुमारास जपानी शास्त्रज्ञ एक टन वजनाचीं रॉकेट्स हवेंत फेकूं शकतील. तीं १२५ मैल उंच जाऊं शकतील. त्यांची लांबी ३३ फूट असेल आणि प्रत्येक रॉकेटला १,५०,००० डॉलर्स खर्च येईल.

**रशिअन एंजिनिअरचा पगार**— भिलई येथें उभारण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याचें काम मि. क्रॅटेन्को हे रशिअन एंजिनिअर करणार आहेत. कामाच्या मुदतींत ते भारतीय सरकारचे नोकर म्हणून काम करतील. त्यांना दरमहा करमाफ ४,००० रुपये पगार देण्यांत येणार असल्याचें समजतें.

**पोपटावर शस्त्रक्रिया**—नाशिक येथील सर्जन मेजर रामदास ह्यांनीं २८ वर्षे वयाच्या पोपटाच्या पायावर नुकतीच यशस्वी शस्त्रक्रिया केली. पोपटाच्या पायाला मांजरानें इजा केली होती. शस्त्रक्रियेच्या वेळीं क्लोरोफॉर्मचा उपयोग न करतां पोपटाच्या पायावर प्लॅस्टर बांधण्यांत आलें होतें.

## पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

**चेअरमन : वि. ज. करंदीकर**

**मॅ. डायरेक्टर : मो. वि. रबडे**

अहवालाचे सालांत बँकेचा व्यवहार १४ शाखा नि ४ उपशाखा यांचेमार्फत चालू होता. बँकेस जोडलेल्या सहकारी पतपेढ्यांची संख्या सालअखेरीस ७७० होती. गतवर्षी ती ७४२ होती.

गेल्या तीन वर्षांचे शेती कर्जाचे आंकडे खाली दिले आहेत:–

| | |
|---|---|
| दिनांक ३०–६–५३ अखेर | रु. ४९,८१,०३२ |
| दिनांक ३०–६–५४ अखेर | रु. ६०,०६,९२९ |
| दिनांक ३०–६–५५ अखेर | रु. ६७,४४,८७५ |
| पीक कर्जाचे येणें बाकीपैकी थकबाकी | रु. २१,८८,९९८ |

वरील थकबाकी मागील वर्षापेक्षा रु. ५,६७,८७३ नें जास्त आहे. याचें मुख्य कारण म्हणजे सन १९५३ व सन १९५४ मध्यें पडलेला जिल्ह्यांतील कांहीं भागांतील दुष्काळ व चालू वर्षी अनपेक्षितपणें भुसार मालाचे व गुळाचे भाव उतरले व कर्ज वाढलें, हें होय. तथापि, अहवालाचे सालांत सोसायट्यांकडून कर्जाचा वसूल रु २६,७९,१५६ चा झाला.

गेलीं तीन वर्षे चालू असलेली बटाटा कर्जयोजना पुणें जिल्हा खरेदी–विक्री संघामार्फत अहवालाच सालींहि चालू होती. चालू सालीं ७१ सोसायट्यांचे १२०७ सभासदांना १२०५ एकर क्षेत्रासाठी बँकेनें रुपये ७,२२,७८४ चें कर्ज मंजूर केलें होतें. पैकीं सोसायट्यांनीं रु. ४,०६,११५ चे कर्जाची मालाचे रूपानें उचल केली.

शेतकी सोसायट्यांना मध्यम मुदत कर्ज देण्याचें धोरण चालू आहे. शेतकऱ्यांना थावें लागणारें पीक–कर्जासाठी रिझर्व्ह बँकेकडून अहवालाचे सालीं बँकेस रु. २५ लक्ष कर्ज मंजूर करण्यांत आलें होतें. वरील सर्व रकमेची उचल करून ती मुदती-पूर्वी परतहि करण्यांत आली आहे. रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांचे-कडून चालू वर्षी मुख्य कचेरीची व कांहीं शाखांची तपासणी करण्यांत आली. त्यांनीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या असून त्यांपैकीं कांहीं मा. बोर्डानें अंमलांतहि आणल्या आहेत.

चालू वर्षी जिल्ह्यांतील तीन नियोजित सहकारी साखर कारखान्यांपैकीं एक, माळेगांव सहकारी साखर कारखाना रजिस्टर झाला असून, सन १९५६ अखेरीस सदर कारखान्यांतून साखरेचें उत्पादन सुरू होईल असें वाटतें. बाकीचे दोन्ही कारखाने रजिस्टर होण्याच्या मार्गावर आहेत.

अहवालाचे सालांत बँकेचें भाग भांडवल ९७ हजारांनीं वाढलें असून बँकेच्या ठेवी ३५ लाखांनीं वाढल्या आहेत. अशा मोठ्या प्रमाणांत ठेवींची वाढ झाल्याचें हें पहिलेंच वर्ष आहे. अहवालाचे सालांत बँकेस निव्वळ नफा रु. १,२२,४०४-१०-११ झाला असून त्याची वांटणी खालीलप्रमाणें करावी अशी मा. बोर्डाची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| १. गंगाजळी | रु. ३३,१०२–०–० |
| २. संशयित व बुडित कर्ज | रु. १०,०००–०–० |
| ३. डिव्हिडंड ६ टक्के प्रमाणें | रु. ४७,०००–०–० |
| ४. बोनस | रु. १२,०००–०–० |
| ५. शाखा इमारत | रु. १२,०००–०–० |
| ६. ग्रॅच्युइटी | रु. १०,०००–०–० |
| ७. शाखा रौप्यमहोत्सव | रु. ३,०००–०–० |
| ८. शिक्षण फंड | रु. १,९८७–८–० |
| ९. प्रचार फंड | रु. ३,३१५-२-११ |

## पुणें जिल्हा सहकारी बोर्ड लि.

**सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्ग, पुणें**

पुणें जिल्हा सहकारी बोर्ड लि. पुणें या संस्थेच्या विद्यमानें पुणें जिल्ह्यांतील सर्व प्रकारच्या सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरीं-साठीं व नवीन होतकरू व्हर्नाक्युलर फायनल पास झालेल्या व आठवी पास झालेल्या विद्यार्थ्यांकरितां सहकारी ट्रेनिंग क्लास पुणें १४८७ शुक्रवार पेठ, पुणें नं. २ येथें बोर्डाचे ऑफिसांत ता. २२ ऑगस्ट सन १९५५ पासून सुरू होणार आहे. क्लासची फी रुपये ३ व परीक्षा–फी रुपाया १ आहे. अर्जासोबत रुपये ३ पाठविले पाहिजेत. कोणत्याहि कारणास्तव फी परत केली जाणार नाहीं. तरी अर्ज व फी मे. सेक्रेटरी, पुणें जिल्हा सहकारी बोर्ड १४८७ शुक्रवार पेठ, पुणें २ या पत्त्यावर ता. २० माहे ऑगस्ट १९५५ पर्यंत पाठवावेत. राहण्याचा व जेवण्याचा खर्च ज्यानें त्यानें स्वतंत्र करावयाचा आहे. क्लासची मुदत साधारण-पणें ६ ते ८ आठवडे इतकी राहील.

**रा. घों. अभ्यंकर**

सेक्रेटरी

पुणें जिल्हा सहकारी बोर्ड लि. पुणें.

### पेठ वडगांव सहकारी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचा रिझल्ट

कोल्हापूर डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्डाच्या विद्यमानें पेठ वडगांव येथें सहकारी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास ता. २०–४–५५ ते २०–६–५५ अखेर भरविण्यांत आला होता. सदरहू क्लासच्या परीक्षेस ६८ विद्यार्थी बसले असून त्यांपैकीं ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. रिझल्ट ९२ टक्के लागलेला आहे. सदरहू क्लासचे चालक श्री. जी. बी. निकम, को-ऑप. ट्रेनिंग इन्स्पेक्टर कोल्हा-पूर, हे होते.

**फक्त पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेच्या सभासदांकरितां**

## नोटीस

पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि. ची वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक ४ सप्टेंबर १९५५ रोजीं सायंकाळीं ६–० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालय (इंग्रजी शाळा) चे सभागृहांत भरणार आहे.

सदर सभेंत दरसालप्रमाणें वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक मंजूर करणें, चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडणें, ऑडिटर्स यांची नेमणूक करून त्यांचें वेतन ठरविणें, पोटनियम नं. ४० (१२) बँकेच्या मालमत्तेसंबंधीं खरेदी–विक्री वगैरेबाबत, पोटनियम नं. ३ (६) ला अनुसरून नवीन पोटनियम (हुंडीव्यवहाराबाबत) व पोटनियम नं. २९ (२), ३३ व ३५ (निवडणुकीबाबत) विचार करणें वगैरे कामें करण्यांत येतील.

तसेंच सन १९५५–५६ सालाकरितां मे. बोर्ड ऑफ डायरे-क्टर्सच्या व स्थानिक हिशेबतपासनिसांच्या निवडणुकीसाठीं मतदान सदर दिवशीं सकाळीं ८–३० ते १२–० वाजेपर्यंत होणार आहे.

तरी सर्व सभासदांनीं सभेस हजर रहावें अशी विनंती आहे.

बोर्डाचे हुकुमावरून

पुणें शहर — **मो. वि. रबडे**

दिनांक ९–८–१९५५ — मॅनेजिंग डायरेक्टर

## लिक्विडेशनमध्यें गेलेल्या किंवा बंद झालेल्या बँका १९३९ ते १९५४

| राज्य | बँकांची संख्या | भांडवल अधिकृत | भांडवल खपलेलें | भांडवल वसूल |
|---|---|---|---|---|
| १९५४ मध्यें | | रु. | रु. | रु. |
| आंध्र | १ | ८,००,००० | ४,७०,५०० | २,४२,६०० |
| दिल्ली | २ | १५,००,००० | १२,८८,४९० | ३,१७,८३० |
| हिमाचल प्रदेश | १ | ७,००,००० | ७,००,००० | ७,०१,००० |
| हैद्राबाद | ३ | २३,१४,२८६ | १०,९०,०४९ | ५,५८,८९४ |
| मध्यभारत | १ | २०,००,००० | १,५३,००० | १,५३,००० |
| मद्रास | ५ | १५,३०,००० | ६,४८,९९३ | ३,७१,२५७ |
| म्हैसूर | १ | १,००,००० | ५५,१५०. | ५२,१३५ |
| त्रावणकोर-कोचीन | ५ | ९,००,००० | ५,०१,५५० | २,६४,३८७ |
| प. बंगाल | ८ | ९०,००,००० | २८,२२,५३२ | २०,९०,८६८ |
| एकूण | २७ | १८८,४४,२८६ | ७७,३०,२६४ | ४७,५०,९७१ |
| अखंड भारत | | | | |
| १९३९ | ११७ | २,७४,३४,९४० | ५३,०४,७७३ | २४,९१,२९८ |
| १९४० | १०७ | ७,३४,३०,००० | ४३,९१,९७७ | २३,९०,३६३ |
| १९४१ | ९४ | १,४९,६४,९९० | २९,६८,४३५ | १२,३८,७८२ |
| १९४२ | ५९ | ६,७६,६०,००० | ३३,५८,७४५ | १४,०६,७४६ |
| १९४३ | ५९ | ४,०३,५०,४८० | १५,५४,४७० | ७,४८,९६७ |
| १९४४ | २८ | ८१,१०,००० | १५,१०,४०८ | ६,२७,२६० |
| १९४५ | २७ | ८१,३१,५०० | ८,५२,३१० | ४,७४,०२५ |
| १९४६ | २७ | २,५०,४५,००० | ११,६९,४७४ | ९,२२,४४१ |
| १९४७ | ३८ | ७,४३,३९,००० | १,००,१५,६५२ | ८२,८३,८४६ |
| स्वतंत्र भारत | | | | |
| १९४८ | ४५ | १२,३७,५९,००० | २,४८,२०,९८८ | १,८२,६८,९०६ |
| १९४९ | ५५ | १०,७०,५८,५७२ | १,९४,१६,७३८ | १,३०,६३,९२१ |
| १९५० | ४५ | ७,११,६०,००० | १,७७,५४,२६८ | १,२४,४९,५२२ |
| १९५१ | ६० | ९,१७,५२,७२७ | ९२,४३,४२६ | ६२,०७,३०५ |
| १९५२ | ३१ | १,३१,०९,८०० | २५,०७,८९३ | १५,७९,६६७ |
| १९५३ | ३१ | ४,९२,८७,००० | १,६३,३५,५५० | १,१३,५७,९१७ |
| १९५४ | २७ | १,८८,४४,२८६ | ७७,३०,२६४ | ४७,५०,९७१ |

## क्लिअरिंगमधील चेक व त्यांची रक्कम

| क्लिअरिंग केंद्र | चेकची संख्या | रक्कम (लक्ष रु.) | चेकची संख्या | रक्कम (लक्ष रु.) |
|---|---|---|---|---|
| कलकत्ता | ६९,९०,४०४ | ३,११८,८४ | ७६,९४,६९४ | २,७५४,२८ |
| मुंबई | १,०५,९४,१२२ | ३,१८०,५७ | १,२४,५६,५०५ | २,७५८,७५ |
| मद्रास | ३३,१६,३२५ | ४८७,०७ | ३९,३७,९५० | ३६१,९४ |
| कानपूर | ६,११,३९५ | ३१५,१८ | ८,५६,६२८ | १४१,९० |
| दिल्ली | १३,५३,१०२ | १६७,५८ | २१,५६,३३७ | २०४,७० |
| बंगलोर | ७,३५,१२८ | ८३,४२ | ८,५९,०५५ | ९८,४८ |
| इतर मुमारें २५ | ४४,४६,४९५ | ६९५,३३ | ६१,१२,१५३ | ७४४,२१ |
| एकूण | २,८०,४७,०७१ | ७,८७७,९१ | ३,४०,७३,३२२ | ७,०६४,२७ |


# बँक ऑफ पूना लि.

(शेडयूल्ड बँक)

अधिकृत भांडवल रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें रु. २५,००,०००
वसूल रु. १२,५०,०००

मुख्य कचेरी :—४५५ रविवार, पुणें

शाखाः—(१) सदाशिव पेठ, पुणें १
(२) डेक्कन जिमखाना चौक, पुणें ४.
(३) सोलापूर (४) सांगली

★

पुणें व सांगली येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय.
बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

★

जी. जी. साठे — मॅनेजर
डी. आर. नाईक जे. पी. — चेअरमन

स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

संकलित भांडवल रु. १,००,०००
जमा भांडवल रु. ९१,०००
फंडस् (रिझर्व्ह व इतर) रु. ८०,०००हून अधिक
ठेवी रु. ६,००,००० ,,
खेळतें भांडवल रु. ९,००,००० ,,

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. डौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. टोवळे, ( उपाध्यक्ष )
श्री. द. अ. टोवळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी., ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाभिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.